औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
फोनं नं. (०२४०)-२३३३५३६-४०
फॅक्स नं. (०२४०) २३३१२१३

बेटी बचाओ
save the girl child

जा.क्र./मनपा/उअ/पापु /जास्था/७४८ /२०१५ दिनांक :- ११ /१२ /२०१५

## बैठकीचे इतिवृत्त

| | |
|---|---|
| प्रकल्प | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना:- समांतर जलवाहिनी पीपीपी प्रकल्प |
| बैठकीची कार्यसुची | समांतर जलवाहिनी पीपीपी प्रकल्प - प्रकल्पाचा विश्लेषणात्मक आढावा (आर्थिक व तांत्रिक बाबी) |
| प्राधिकरण | औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद |
| कन्सेशनर | औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी लिमीटेड (ACWUCL) |
| संदर्भ | दिनांक २२ सप्टेंबर २०११ रोजी महानगरपालिका व कन्सेशनर यांचे सोबत झालेले कन्सेशन ॲग्रीमेंट |
| बैठकीचा दिनांक व वेळ | ०९ डिसेंबर २०१५, सकाळी १०.०० वाजता |
| बैठकीचे स्थळ | मुख्य प्रशासक, सिडको, औरंगाबाद यांचे मुख्य कार्यालय |
| अध्यक्ष | आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद |

**बैठकीला खालीलप्रमाणे उपस्थिती होती :**

| अ.क्र. | नाव | पद आणि कंपनी |
|---|---|---|
| १. | प्रमोद राठोड | मा.उप महापौर, महानगरपालिका औरंगाबाद |
| २. | दिलीप थोरात | मा. सभापती, स्थायी समिती, महानगरपालिका औरंगाबाद |
| ३. | राजेंद्र जंजाळ | मा.सभागृह नेता, महानगरपालिका औरंगाबाद |
| ४. | राजू वैद्य | मा.गटनेता, रा.लो.आ., महानगरपालिका औरंगाबाद |
| ५. | भगवान घडामोडे | मा.गटनेता, भाजपा, महानगरपालिका औरंगाबाद |
| ६. | राज वानखेडे | स. नगरसेवक, महानगरपालिका औरंगाबाद |
| ७. | वैशाली खाडीलकर | जलतज्ज्ञ, दिलासा संस्था, औरंगाबाद |
| ८. | एस.डी. पानझडे | शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद |
| ९. | एच.ए. कोल्हे | कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| १०. | ए.ए. थोरात | मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद |
| ११. | यु.जी. शिरसाठ | उप अभियंता, पाणी पुरवठा, जायकवाडी (यांत्रिकी,) महानगरपालिका औरंगाबाद |
| १२. | के.एम. फालक | प्र. उप अभियंता, पाणी पुरवठा, जायकवाडी (स्थापत्य,) महानगरपालिका औरंगाबाद |
| १३. | अशोक पद्मे | प्र. उप अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| १४. | के.पी. धांडे | शाखा अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |



11/12/15

| | | |
|---|---|---|
| १५. | आय.बी.ख्वाजा | उप अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| १६. | एस.पी. जोशी. | शाखा अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| १७. | एम.एम. बाविस्कर | दुय्यम आवेक्षक, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| १८. | जय शंकर द्विवेदी | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| १९. | अर्णब घोष | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| २०. | सोनल खुराणा | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| २१. | पंकज वरुडकर | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| २२. | आशीष पोरवाल | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| २३. | अमीत बेरा | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| २४. | रमेश सोनकांबळे | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| २५. | एस.ए. खडायते | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| २६. | नरेश नानोटकर | स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी |
| २७. | आर.बी. होनकळसे | स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी |
| २८. | विजय इंगोले | स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी |
| २९. | वीपीन हटकर | स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी |
| ३०. | बी.अशोककुमार | स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी |
| ३१. | कैलास केजगीर | प्रकल्पाचे स्वतंत्र लेखा परिक्षक |
| ३२. | सेतु दिवेकर | महानगरपालिकेचे सल्लागार |

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीची कार्यसुची सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून देवून यापुर्वी दिनांक ०७.१२.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमधील चर्चा व कन्सेशनर यांचे निर्णय घेणारे सक्षम प्रतिनिधी बैठकीस हजर असल्याने आजच्या बैठकीमध्ये समांतर जलवाहिनी योजनेच्या आर्थिक, तांत्रिक बाबीं विषयी सखोल विश्लेषणात्मक चर्चा होणार असल्याचे नमूद केले. त्यानुषंगाने खालील मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.

- समांतर जलवाहीनी प्रकल्पास उपलब्ध होणारे एकूण शासन अनुदान तसेच कन्सेशनर यांना टाकावयाची एकूण रक्कम याबाबतही विस्तृत स्वरुपात चर्चा झाली. या योजनेकरीता महानगरपालिकेने कन्सेशनर यांना एकूण रुपये १२१.७५ कोटी रक्कम अदा केली आहे. त्यानुसार कन्सेशनर यांनी किती खर्च केला याची विचारणा केली असता नोव्हेंबर अखेर पर्यंत कन्सेशनर यांचे मार्फत देखभाल दुरुस्ती करीता (O&M) रुपये १०० कोटी व नविन योजनेच्या भांडवली कामांसाठी नेमलेल्या कंत्राटदारास देण्यात आलेली आगाऊ रक्कम रुपये १४९ कोटी असे एकूण २४९ कोटी रुपये खर्च केल्याचे सांगितले. तसेच या खर्च झालेल्या रकमेचे सविस्तर विवरण सादर केले. देखभाल दुरुस्ती करीता खर्च केलेल्या रकमेची आयुक्तांनी तपासणी करुन महानगरपालिकेने योजना हस्तांतर होण्यापुर्वी केलेल्या खर्चाशी तुलना केली असता देखभाल दुरुस्ती, अस्थापनेवरील खर्च तसेच टँकरवरील खर्च खुपच जास्त असल्याचे कन्सेशनर यांच्या निदर्शनास आणून दिले. या खर्चामध्ये कन्सेशनर यांनी कपात करावी कारण योजनेवर खर्च होणारा प्रत्येक पैसा हा जनतेचा असून



Page 2

11/12/15

त्याचा विनियोग योग्य प्रकारे होणे गरजेचे असल्याने खर्चाच्या विवरणाची बाब निहाय सविस्तर माहिती कन्सेशनर यांनी लेखी स्वरुपात सादर करण्याचे निर्देश दिले.

- कन्सेशनर यांचे वतीने टँकर व विद्युत देयकांवर जास्त खर्च होत असल्याचे निदर्शनास आणून दिले असता कन्सेशनर यांनी टँकरसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने मंजुर केलेल्या दरांचा आणि जालना व बिड जिल्ह्यांकरीता मान्य असलेल्या टँकरच्या दरांचा अभ्यास करुन त्याप्रमाणे कमीत कमी दर ठरवावेत असे निर्देश दिले. सातारा-देवळाई परिसरासाठी भविष्यात आवश्यक असणाऱ्या टँकरच्या दरा करीता देखील वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच विद्युत देयके कमी करण्यासाठी योजनेवरील उपांगाची तपासणी करुन विद्युतभार कसा कमी करता येईल याबाबत तज्ञांची मदत घेऊन कार्यवाही करावी असेही निर्देश दिले.

- कन्सेशनर यांनी सादर केलेल्या Financial Model ची सविस्तर तपासणी आयुक्त यांनी करुन कन्सेशनरतर्फे केल्या जाणाऱ्या गुंतवणुकीच्या प्रमाणात नफ्याचे प्रमाण खुपच जास्त आहे, तसेच हे प्रमाण साधारणत: २०% व त्यापुढे असल्याचे दिसून आल्याचे त्यांनी नमुद केले. यावर कंपनीच्या प्रतिनिधींनी त्यांच्या नफ्याचे प्रमाण Project IRR व Equity IRR शी निगडीत असल्याची बाब नमुद केली. त्यावर आयुक्त यांनी खुलासा समाधानकारक नसल्याचे नमुद करुन पुढील आक्षेप नोंदविले. ज्यामध्ये कंपनीला मिळणारा नफा जास्त प्रमाणात असणे, उद्‌भवाची व शहरापर्यंत पाणी आणण्यासाठी आवश्यक कामे प्राधान्याने सुरु न करणे, जे की शासन निर्णयाच्या विरुध्द आहे, शहरामध्ये दोन ते तीन दिवसाआड पाणी पुरवठा करणे, वितरण प्रणालीचे सुधारीत हायड्रॉलीक मॉडेल अद्यापही सादर न करणे, महानगरपालिकेच्या अस्तित्वातील सर्व जलकुंभाचा हायड्रॉलिक मॉडेलमध्ये समावेश न करणे इत्यादी बाबी स्पष्ट केल्या. संपुर्ण वितरण व्यवस्था Google Map वर दर्शविण्यात यावी, तसेच वितरण व्यवस्थेतील जलकुंभांचे स्थान दर्शविणारा Google Map सादर करणेबाबत निर्देश दिले.

- कन्सेशनर यांनी Financial Closure अद्यापही सादर केलेले नाही. तसेच या प्रकल्पासाठी बँकेने कर्ज दिले नाही तर स्वत:चा निधी वापरुन प्रकल्प पुर्ण केला जाईल असे लिखीत स्वरुपात कन्सेशनर यांनी पत्र दिलेले असल्याचे शहर अभियंता यांनी नमुद केले. तसेच महानगरपालिकेतर्फे पहिल्या चार एकत्रित माईलस्टोनचे अनुदान कन्सेशनर यांना वितरीत करुनही प्रकल्पाची भांडवली खर्चाची कामे महानगरपालिकेने मंजुर केलेल्या तीमाही माईलस्टोननूसार झाली नसल्याचे निदर्शनास आणून दिले व ही बाब अत्यंत गंभिर असल्याचे प्रतिपादित केले.

- निविदा दाखल करणारी मुळ कंपनी SPML यांचा काळ्या यादीत समावेश होता काय अशी विचारणा आयुक्तांनी केली असता या कंपनीस उत्तरप्रदेश जलनिगमने काही कालावधी करीता त्यांच्या निविदांमध्ये सहभाग घेण्यास तात्पुरत्या स्वरुपात स्थगीती दिली होती. महानगरपालिकेने कंपनी काळ्या यादीत नसल्याबाबतचे हमीपत्र निविदा कार्यवाही अंतर्गत घेतलेले असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. त्यानंतर त्यांनी केलेल्या कामामध्ये सुधारणा झाल्यानंतर उक्त स्थगीती उठविण्यात आल्याची बाब तसेच आज रोजी कंपनीकडे याच प्रकारचे विविध प्रकल्प सुरु असल्याची बाब कन्सेशनर यांचेमार्फत स्पष्ट करण्यात आली. याबाबतचे सर्व कागदपत्र सादर करण्याचे निर्देश आयुक्त यांनी दिले.

11/12/15

- निविदा दाखल करताना प्राप्त २ निविदांवरच निविदा प्रक्रिया अंतिम करण्यात आल्याने आयुक्तांनी नाराजी व्यक्त करुन स्पष्टीकरण मागितले. यावर शहर अभियंता यांनी निविदा अंतिम करणारी संस्था ही महानगरपालिका असली तरीही निविदा प्रक्रिया दरम्यान निविदा अंतिम होइपर्यंत प्रत्येक स्तरावर महाराष्ट्र शासन, राज्य शासनाचा पीपीपी सेल, केंद्र शासन यांना कळविण्यात येवून त्यांचे मार्गदर्शन घेण्यात आले असल्याचे सांगितले. प्राप्त दोन निविदांवरच निविदा अंतिम होत असल्याची बाबही निदर्शनास आणून दिलेली असतानाही निविदा तुलनेसंदर्भाने कुठल्याही स्तरावर आक्षेप घेण्यात आलेला नाही ही बाब बैठकीमध्ये निदर्शनास आणून दिली. यावर याबाबतची सविस्तर कागदपत्र सादर करण्याचे निर्देश आयुक्त यांनी दिले.

- आयुक्त यांनी प्रकल्पाच्या माईलस्टोन संदर्भाने सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश दिले. यावर कंपनीचे प्रतिनिधी यांनी प्रत्येक माईलस्टोन संदर्भाने उपांगनिहाय माईलस्टोनची सुरुवात व संपण्याच्या कालावधीसह माहिती सादर केली. या माईलस्टोन संदर्भाने आयुक्त यांनी कुठलेही माईलस्टोन विहीत मुदतीत पुर्ण न झाल्यामुळे नाराजी व्यक्त केली. माईलस्टोननुसार जॅकवेल, जलशुध्दीकरण केंद्र, पाण्याच्या उंच टाक्या यांचे आर.सी.सी. संकल्पन सादर करणे आवश्यक असतांना त्यापैकी एकाचेही आर.सी.सी. संकल्पन कंपनीने सादर केले नसल्यामुळे नाराजी व्यक्त केली. त्याचप्रमाणे संपुर्ण माईलस्टोनची हार्ड कॉपी सादर करण्याचे निर्देश दिले.

- कन्सेशनर यांनी मुख्य योजनेकडे दुर्लक्ष करुन वितरण व्यवस्थे अंतर्गत २६ किमी लांबीच्या जलवाहीन्या टाकल्या याबाबतीत आयुक्त यांनी नाराजी व्यक्त करुन यासाठी किती खर्च केला याबाबत विचारणा केली. या जलवाहीन्यांकरीता रुपये ४.५ कोटी खर्च झाल्याचे कन्सेशनर यांचे मार्फत सांगण्यात आले. तसचे स्वतंत्र अभियंता यांनी उद्‌भव विहिर, पंपींग मशिनरी, फारोळा पर्यंत जलवाहीनी इत्यादींना लागणारा खर्च बैठकीत सांगितला. त्यावर आयुक्त यांनी कंपनीने विनाकारण १०० कोटींची आगावू रक्कम त्यांच्या EPC Contractor ला देवून चुकीचे काम केल्याची बाब निदर्शनास आणून दिली. तसेच महानगरपालिकेने रुपये १२२ कोटी कन्सेशनर यांना देवूनही या रकमेचा योग्य विनियोग न झाल्याने संपुर्ण शहरातील १५ लाख नागरीकांना कन्सेशनर यांनी वेठीस धरलेले असून शहराचे पाणी परिमाण न वाढविल्यामुळे महानगरपालिकेस नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागत असल्याचेही स्पष्ट केले. या प्रकल्पात कन्सेशनर महानगरपालिकेचे भागीदार असल्याने याबाबतीत भारतीय दंड संहितेनुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल म्हणून स्पष्ट केले.

- या प्रकल्पाचा डीपीआर हा चुकीच्या गृहीतकांवर आधारीत असल्याचेही आयुक्त यांनी मत व्यक्त केले. या अंतर्गत जायकवाडी प्रकल्पात पुढील ५० वर्षात होणारा गाळ संचय गृहीत धरलेला नाही, पंपांची कार्यक्षमता ही वाजवी पेक्षा जास्त गृहीत धरलेली आहे, जलवाहीनीचे संकल्पन करतांना जमीन पातळीनुसार त्या त्या ठिकाणी पाईपचा व्यास व जाडी कमी होऊ शकते का व पर्यायाने खर्चात बचत होऊ शकते काय याची तपासणी केलेली नाही व प्रकल्पाचे Optimum डिझाईन देखील न केल्याचे तसेच मुख्य योजनेतून पाणी न वाढविता वितरण व्यवस्थेतील पाईपलाईन टाकण्याची कामे केल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. या बाबीं विषयी स्वतंत्र अभियंता यांनी देखील समाधान कारक कार्यवाही केलेली नसल्याचेही आयुक्तांनी स्पष्ट केले. या सर्व बाबींचा विचार करता व आतापर्यंत कन्सेशनर यांनी केलेली दिरंगाई लक्षात घेता कन्सेशनर व स्वतंत्र अभियंता


11/12/15

यांना त्यांचा करारनामा रद्द का करु नये या आशयाची कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश आयुक्त यांनी दिले.

- पाणी परीमाण न वाढविता वितरण व्यवस्थेत पाईप का टाकले या बाबत आयुक्तांनी पुन्हा विचारणा केली असता दुषीत पाणी पुरवठ्याच्या तक्रारी, राजकीय दबाव तसेच गळत्यांचे प्रमाण लक्षात घेवून जलवाहीन्या टाकण्यात आल्याचे कन्सेशनर यांनी स्पष्टीकरण दिले. यावर यानंतर कुठल्याही परिस्थीतीत इत:पर आयुक्तांची पुर्व परवानगी घेतल्याशिवाय वितरण व्यवस्थेमध्ये नव्याने जलवाहीन्या टाकण्यात येवू नये असे बैठकीत आयुक्त यांनी निर्देश दिले.

- स्वतंत्र अभियंता यांची या प्रकल्पाच्या प्रती महत्वाची भूमिका असून येत्या तीन वर्षात रुपये १८ कोटी इतकी मोठी रक्कम त्यांना मिळणार आहे. असे असतांना स्वतंत्र अभियंता यांची कामगिरी समाधान कारक नसल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. याबाबतीत स्वतंत्र अभियंता यांनी सक्षमपणे व प्रभावीपणे तसेच संपुर्ण तांत्रिक ज्ञानाचा वापर करुन प्रकल्पाप्रती आपले संपुर्ण समर्पण देण्याची बाब नमुद केली. प्रकल्पाची कामे पुर्ण करुन घेण्याची जबाबदारी ही स्वतंत्र अभियंता यांची असल्याची बाब आयुक्त यांनी स्पष्ट केली. तसेच स्वतंत्र अभियंता यांच्या वरीष्ठ प्रतिनिधींनी पुर्ण वेळ औरंगाबाद मुख्यालयी राहून प्रकल्पास गती मिळेल या दृष्टीने कार्यवाही करावी असे निर्देश दिले.

- पाणी पुरवठा योजनेमध्ये संतुलन जलकुंभ हा महत्वाचा घटक असून मुख्य योजनेत २ ते ४ तास क्षमतेचा व्यत्यय आल्यास त्याचा परिणाम शहर पाणी पुरवठ्यावर होऊ नये या करीता संतुलन जलकुंभ असणे गरजेचे आहे. तथापी तांत्रिकदृष्ट्या संतुलन जलकुंभाचे व्यवस्थीत संकल्पन तपासावे त्याचप्रमाणे या प्रस्तावीत नविन संतुलन जलकुंभामुळे शहर वितरण प्रणालीतील पंपींग स्टेशन कमी होऊन वितरण व्यवस्थेत हायड्रॉलिकली फायदा होईल याची खात्री करावी. या बाबतचा आश्वासीत अहवाल स्वतंत्र अभियंता यांनी द्यावा असे निर्देश आयुक्त यांनी दिले.

- आयुक्त यांनी कन्सेशनरमार्फत Appointed Date पासून फक्त वितरण व्यवस्थे अंतर्गत जलवाहिन्या टाकण्यात येत असून नविन योजनेची कुठलीही कामे न केल्यामुळे तिव्र नाराजी पुन्हा व्यक्त केली. तसेच जर मुख्य योजनेची (Bulk Water संबंधित) म्हणजेच हेडवर्क्स, रॉ वॉटर आणि प्युवर वॉटर मुख्य जलवाहीनी, जलशुध्दीकरण केंद्र इ. कामे करुन पाणी परिमाण वाढविले असते तर नागरीकांना वाढीव पाणी परिमाण मिळून महानगरपालिकेला त्यांच्या रोषास सामोरे जावे लागले नसल्याची बाबही स्पष्ट नमूद केली. तसेच या संदर्भाने त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

All five Pages signed.

O/c

11/12/15

Page (5)

आयुक्त 11/12/15

महानगरपालिका औरंगाबाद